## नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ महाराष्ट्र अधिनियम क्र.१० सन २०१० सुधारणांनुसार चे कलम १२७ चे पोटकलम १ (अ) कलम १२८ (क) कमल १२९ तसेच अनुसूची प्रकरण ८ चे नियम ७ (क) व त्या मधील प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तीचा वापर करुन आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती च्या मान्यतेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ची सुधारणा १२ दि.२१ मे २०११ चे कलम ३६ (ख ) (के) नुसार इमारतीच्या व जमिनीच्या प्रवर्गाचा तपशिलाच्या बाबतीत विविध प्रवर्गाना नेमुन द्यावयाच्या बहुविध भारांकाच्या आधारे जमिनी व मालमत्तांचे भांडवली मुल्य निश्चीत करण्याचे नियम तयार करण्यात आले आहेत.

### -: नि य म :-

**१) संक्षिप्त नांव व प्रारंभ :-**

१) या नियमास मालमत्ताची भांडवली मुल्याधारीत कर आकारणी भारांक निश्चीत करण्याचे नियम २०११ असे संबोधण्यात येईल

२) दिनांक ०१/०४ /२०११ रोजी अमंलात येतील.

**२) व्याख्या : संदर्भानुसार दुसरा अर्थ.अपेक्षित नसेल तर या नियमात :-**

a) ``**अधिनियम**`` म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ व सुधारणा अधिनियम सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ व सुधारणा अधिनियम क्र.१० सन २०१० व या अधिनियमातील इतर सुधारणा

b)``**शेडयुल -अनुसुची** ``म्हणजे या नियमातील अनुसुची

c) ``**कलम**`` म्हणजे अधिनियमाचे कलम

d) ``**भांडवली मुल्य** ``म्हणजे अनुसूची प्रकरण ८ चे नियम ७ (क) अन्वये ठरविल्याप्रमाणे मालमत्ता कराच्या आकारणीस पात्र असलेल्या कोणत्याही इमारतीचे जमीनीचे भांडवली मुल्य व इतर भारांकाचे गुणोत्तर

e) कोणत्याही महानगरपालिकेच्या क्षेत्राच्या संबंधात रद्द केलेला अधिनियम म्हणजे अधिनियमाचे कलम ४९० द्वारे विवक्षित अधिनियम शहरात लागु होण्याचे बंद होईल असा महानगरपालिका अधिनियम

f) ``**कर**`` म्हणजे अनुसूची प्रकरण ८ मधील नियम ७ क अन्वये महानगरपालिकेने कोणत्याही इमारतीवर किंवा जमिनीवर अथवा त्या वर बसविलेला किंवा बसविण्यायोग्य असलेला मालमत्ता कर.

g)``**इमारत**`` म्हणजे माणसाने राहण्याचे घर म्हणून किंवा अन्य प्रकारे उपयोग करण्यात येत असलेले कोणतेही फ्लॅट (सदनिका) ,घर,उपगृह,तबेला, छपरी, झोपडी व अन्य प्रवेशित जागा किंवा सरंचना यांचा समावेश होतो मग तो चिरेबंद असो किंवा विटा, लाकुड , चिखल, धातु किंवा अन्य कोणतेही सामान याने बांधलेली असो. तसेच त्या संज्ञेत, व्हरांडे, कायम बसविलेले चबुतरे , जोते,दाराच्या पायऱ्या, आवाराच्या भिंती व कुंपण धरुन भिंत व तत्सम भाग यांचा समावेश होतो.

h)``**शहर**`` म्हणजे भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २४३ भुखंड (२) अन्वये किंवा अन्य अधिनियमाचे कलम ३ पोटकलम (२) अन्वये अधिक मोठया नागरी क्षेत्राच्या संबंधात काढण्यात आलेल्या अधिसुचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले एक शहर बनवावे असे अधिक मोठे नागरी क्षेत्र.